एकस्तर पदोन्नतीच्या अनुषंगाने गट विमा योजनेची वर्गणी वसूल करण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

**संचालनालय, लेखा व कोषागारे,**
**३ रा मजला, ठाकरसी हाऊस,**
**शुरजी वल्लभदास मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई- ४०० ००१.**

**परिपत्रक**

क्र. संलेको/गवियो/२०२०/गट विमा योजना/७०२ दिनांक : 15 DEC 2020

संदर्भ :- (१) वित्त विभाग, शासन निर्णय क्र. डीओआय-२०८१/४७०१/एडीएम-५, दिनांक २६/०४/१९८२.

(२) कक्ष अधिकारी, वित्त विभाग, विमा प्रशासन यांचे पत्र क्र. संकीर्ण-२०१९/प्र.क्र. ७२/विमा प्रशासन, दिनांक २५/०८/२०२०.

आदिवासी किंवा नक्षलग्रस्त भागातील कार्यालयात नियुक्त झालेल्या राज्य शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांना त्यांचे या क्षेत्रातील कार्यकालासाठी एकस्तर पदोन्नती योजनेचा लाभ दिला जातो. या क्षेत्रात कार्यरत अधिकारी/कर्मचाऱ्यांना एकस्तर पदोन्नतीच्या अनुषंगाने वरिष्ठ गटातील वेतनश्रेणी लागू होतात. अशा अधिकारी/कर्मचाऱ्यांची गट विमा योजनेची वर्गणी काही कार्यालयांतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणीच्या (एकस्तर पदोन्नतीच्या) वर्गाच्या अनुषंगाने कपात करण्यात आल्याचे संचालनालयाच्या निदर्शनास आले आहे. त्यामुळे गट विमा योजनेचे अंतिम प्रदानाचे लाभ त्यांना वरिष्ठ वेतनश्रेणीच्या वर्गाच्या अनुषंगाने द्यावे लागतात व त्याचा अनावश्यक आर्थिक भार गट विमा योजनेच्या विमा निधीवर पर्यायाने शासनावर येत आहे.

गट विमा योजनेची वर्गणी ही कर्मचाऱ्याच्या वर्गाशी संबंधित आहे. संदर्भ क्र. १ मधील, मुद्दा क्र. ५.२ नुसार "एखाद्या कर्मचाऱ्यास एका वर्गातून दुसऱ्या वर्गात नियमीतपणे बढती मिळाल्यास योजनेच्या पुढील वर्धापनदिनापासून त्याच्या योजनेच्या वर्गणीत, त्याला ज्या वर्गात बढती मिळाली असेल त्या वर्गणीच्या समुचित पातळीप्रमाणे वाढ करण्यात येईल."

एखाद्या कर्मचाऱ्याची पदोन्नती अल्पकालावधीसाठी नसेल आणि तो कर्मचारी तो कालावधी संपल्यानंतर खालच्या श्रेणीतील पदावर पदावनत होण्याची शक्यता नसेल तर अशा कर्मचाऱ्यांची नियमीत

पदोन्नती झालेली आहे असे समजण्यात येते आणि त्याची वर्गणी त्या वर्गाप्रमाणे वसूल करण्यात येते. आदिवासी किंवा नक्षलग्रस्त क्षेत्रात कार्यरत कर्मचाऱ्यांना एकस्तर पदोन्नतीच्या अनुषंगाने वरिष्ठ गटातील वेतनश्रेणी लागू होत असली तरी सदर पदोन्नती ही अल्पकालावधीसाठी असते व सदर कर्मचारी आदिवासी किंवा नक्षलग्रस्त क्षेत्रातून बिगर आदिवासी किंवा बिगर नक्षलग्रस्त क्षेत्रात कार्यरत झाल्यास त्याचा मूळ वेतनश्रेणीप्रमाणे त्यांना वेतन अदा होते. त्यामुळे एकस्तर पदोन्नतीचा लाभ घेणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून त्यांच्या मूळ वेतनश्रेणीप्रमाणे गट विमा योजना वर्गणी घेण्यात यावी व त्यानुसारच त्यांना गट विमा योजनेचे लाभ प्रदान करण्यात यावे. आदिवासी किंवा नक्षलग्रस्त भागातील कोषागारांना असे सूचित करण्यात येते की, त्यांचे अधिनस्त सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांना परिपत्रकाद्वारे मूळ वेतनश्रेणीनुसार गट विमा योजना वर्गणी कपातीबाबत आपल्या स्तरावर सूचना देण्यात याव्यात. तसेच, अतिरिक्त वर्गणीची कपात केली असल्यास त्याचे समायोजन करण्याबाबत अवगत करण्यात यावे. सर्व कोषागार अधिकाऱ्यांना सूचित करण्यात येते की, वेतन देयके पारित करताना सदर बाबीची खातरजमा करुनच वेतन देयके पारीत करावीत.

(ज. र. मेनन)
**संचालक, लेखा व कोषागारे,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

प्रति,

१.सर्व विभागीय सहसंचालक, कोकण विभाग / पुणे / नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती / नागपूर.

२.अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय,मुंबई.

३.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, महाराष्ट्र राज्य.

प्रत-

१. उपसचिव, विमा प्रशासन, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.